**मंत्रिमंडळ उपसमितीने घेतलेल्या निर्णयानुसार ह्योसंग इंडिया प्रा.लि. या वस्त्रोद्योग घटकास वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अन्वये भांडवली अनुदानाचे लाभ प्रदान करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय क्र. धोरण-२०२४/प्र.क्र.९५/टेक्स-५**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- २४ सप्टेंबर, २०२६**

**वाचा :-** १) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र: धोरण २०१७/प्र.क्र.०६/टेक्स-५, दि.१५ फेब्रुवारी, २०१८.

२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र: धोरण २०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५, दि.०२ जून, २०२३.

३) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र: धोरण २०२३/प्र.क्र.८१-अ/टेक्स-५, दि.१२ डिसेंबर, २०२३ व दि.०६ मार्च,२०२४.

४) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र: धोरण - २०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५, दि.२८ ऑगस्ट, २०२४.

५) शासन शुध्दीपत्रक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र: धोरण - २०२३/प्र.क्र.८१/ टेक्स-५, दि.०७.०८.२०२६.

६) मा. मुख्यमंत्री महादेयांच्या अध्यक्षतेखाली दि.१४.०२.२०२४ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :-**

मा. मुख्यमंत्री महादेयांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभागासाठी स्थापन करण्यात आलेल्या मा. मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक दि.१४.०२.२०२४ रोजी पार पडली होती. या बैठकीत ह्योसंग इंडिया प्रा.लि. या घटकाच्या प्रकल्पासंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे:-

"ह्योसंग इंडिया प्रा.लि. यांचा अतिविशाल प्रकल्प हा ऑरिक सिटी शेंद्रा, जि. छत्रपती संभाजीनगर येथे स्थित असून सदर प्रकल्पातून इलेस्टोमेरिक यार्न्स (स्पॅन्डेक्स) ची निर्मिती करणार आहे. या घटकाद्वारे केली जाणारी गुंतवणूक व रोजगार निर्मिती विचारात घेता, सदर घटकाने केलेल्या अतिरिक्त मागण्यासंदर्भात उच्चाधिकार समितीने घेतलेल्या निर्णयावर मा. मंत्रिमंडळ उपसमितीने चर्चा करून खालीलप्रमाणे निर्णय घेतला:-

१) घटकाने २०१८ ते २०२३ या कालावधीत प्रकल्पात स्थापित केलेली यंत्रसामुग्री जरी त्या धोरण काळातील TUF मध्ये पात्र असलेल्या यंत्रसामुग्रीच्या यादीत अंतर्भूत नसली तरीही ती अत्याधुनिक असेल व तिचा समावेश जर वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ च्या धोरण कालावधीतील मान्य यंत्रसामुग्रीत झालेला असेल तर त्याबाबत वस्त्रोद्योग विभागाने तपासून खात्री करावी व त्याला मान्यता देण्याबाबत पुढील कार्यवाही वस्त्रोद्योग विभागाने करावी.

२) घटकाने वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ मधील तरतूदीनुसार विदर्भ, मराठवाड्यातील प्रकल्पांना अतिरीक्त भांडवली अनुदान अनुज्ञेय करण्याची विनंती केली आहे. घटकाचा प्रस्तावित प्रकल्प हा मराठवाडा या भागातील अतिविशाल प्रकल्प असून घटक प्रस्तावित प्रकल्पात नव्याने गुंतवणूक होणार असल्याने एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अंतर्गत अनुज्ञेय प्रोत्साहने वस्त्रोद्योग विभागामार्फत देय करण्यात यावे.

३) घटकाने तालुक्यातील पहिला प्रकल्प असल्यामुळे प्रस्तावित प्रकल्पातील रु.५०० पेक्षा जास्त प्रकल्प खर्चाच्या अनुषंगाने अतिरिक्त ५% अनुदान, तर त्यापुढील रु.५०० कोटीपेक्षा अधिक गुंतवणूकीवर पुन्हा ५% अनुदान देय करण्याची विनंती केली आहे. प्रस्तावित प्रकल्प हा अतिविशाल प्रकल्प असून घटक प्रस्तावित प्रकल्पात नव्याने गुंतवणूक करणार असल्याने एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अंतर्गत अनुज्ञेय प्रोत्साहने वस्त्रोद्योग विभागामार्फत देय करण्यात यावी.”

२. सदर निर्णयाच्या अनुषंगाने दि. ०८ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये सदर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभागासाठी स्थापन करण्यात आलेल्या मा. मंत्रिमंडळ उपसमितीने दि.१४.०२.२०२४ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार ह्योसंग इंडिया प्रा. लि. या वस्त्रोद्योग घटकाने वस्त्रोद्योग धोरण, २०१८-२३ या धोरण कालावधीत प्रकल्पात स्थापित केलेल्या यंत्रसामुग्रींना एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अन्वये अनुज्ञेय भांडवली अनुदानाचे लाभ प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

वरील प्रस्तावनेमध्ये नमूद केल्यानुसार शासन आता खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

ह्योसंग इंडिया प्रा. लि. या वस्त्रोद्योग घटकाने वस्त्रोद्योग धोरण, २०१८-२३ या धोरण कालावधीत प्रकल्पात स्थापित केलेल्या यंत्रसामुग्रींना एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अन्वये एक विशेष बाब म्हणून भांडवली अनुदानाचे अनुज्ञेय लाभ प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. हा निर्णय पूर्वोदाहरण म्हणून अन्य वस्त्रोद्योग घटकांना लागू राहणार नाही.

३. सदर शासन निर्णय दिनांक ०८ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९२४१६२९४६४५३६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIKRISHNA BABURAO PAWAR

Digitally signed by SHRIKRISHNA BABURAO PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT,
2.5.4.20=631cf5e4544a7032340c686106b15138df3ef3b889e86fb2026c1add12d27e41, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=2FAFF40BB05D156355556F7264A3A59AD12DD42F183422309976C41CE28C0A1D, cn=SHRIKRISHNA BABURAO PAWAR
Date: 2026.09.24 16:30:53 +05'30'

**(श्रीकृष्ण पवार)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (रा.उ.शु., क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक कल्याण आणि औकाफ) महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
७. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
८. मा. खासदार (सर्व), महाराष्ट्र राज्य.
९. मा. आमदार (सर्व), महाराष्ट्र राज्य.
१०. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
११. मा. मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई.
१२. अ. मु.स. (वित्त) मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, गुंतवणूक व सेवा विभाग, मंत्रालय मुंबई.
१४. सचिव (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग मंत्रालय मुंबई.
१५. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर

१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१७. महालेखापाल (लेखा व लेखा अनुज्ञेयता/लेखा परिक्षा महाराष्ट्र राज्य १/२, मुंबई, नागपूर.
१८. वस्त्रोद्योग विभागातील सर्व कार्यासने.
१९. निवड नस्ती (कार्यासन टेक्स-५).